# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### हिंगोली जिल्हयातील पैनगंगा नदीवरील बंधाऱ्याचे बांधकाम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१) ३७४३ (२४-१२-२०१४). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील पैनगंगा नदीवरील बंधाऱ्याचे बांधकाम अपूर्णावस्थेत असून सध्या बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधाऱ्याचे अपूर्णावस्थेत असलेले बांधकाम तातडीने पूर्ण करणार आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-०९-२०१६) :**(१) या विभागांतर्गत हिंगोली जिल्ह्यात पैनगंगा नदीवर बॅरेजची कामे नाहीत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सोलापूर जिल्हयात प्रत्येक तालुक्यामध्ये स्वर्ण जयंती ग्रामस्वंयरोजगार योजना व एमएसआरएल अंतर्गत विक्री केंद्रे सुरु करण्याबाबत

**(२) १३७६६ (०८-०४-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात प्रत्येक तालुक्यामध्ये स्वर्ण जयंती ग्रामस्वंयरोजार योजना व एमएसआरएल अंतर्गत तालुक्यात विक्री केंद्र बांधण्यात येऊन एक वर्षाहून अधिक कालावधी होऊनही त्याचा वापर अद्यापही करण्यात येत नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू विक्री केंद्रे त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०९-२०१६) :**(१) व (२) शासन निर्णय दिनांक २७.०२.२००९ अन्वये कायमस्वरुपी तालुका विक्री केंद्र बाधणे ही योजना मंजूर करण्यात आलेली आहे. त्यानुसार मंजूर टाईप प्लाननुसार सोलापूर जिल्ह्यातील ५ तालुक्यातील विक्री केंद्राचे बांधाकाम पूर्ण झालेले आहे. मंगळवेढा तालुका विक्री केंद्र बचत गटांना व्यवसायाकरीता उपलब्ध करुन दिलेले असून त्यामध्ये ६ बचत गटांचा सहभाग आहे.

उर्वरित तालुका विक्री केंद्रांचा अंतर्गत सुविधा उदा. पाणी पुवठा व विद्युत इत्यादी अभावी वापर करण्यास अद्याप सुरुवात करण्यात आलेले नाही.

तालुका विक्री केंद्र त्वरीत सुरु करण्यासाठी त्यांच्या बांधकामाकरीता होत असलेला अतिरिक्त खर्च त्याच विक्री केंद्राच्या निधीवरील जमा असलेल्या व्याजाच्या रक्कमेतून खर्च करण्याबाबत शासन पत्र दिनांक ३०.०३.२०१६ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सोलापूर यांचेमार्फत संबंधित गट विकास अधिकारी यांना बचत गटांकडून प्रस्ताव मागणी करुन रोटेशन पध्दतीने दोन आठवड्यांकरीता विक्री केंद्रातील गाळे देण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यातील सरहद्दीवरील म्हसवडी या घाटातील रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(३) ४३१०२ (२९-०४-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्ह्यातील सरहद्दीवरील म्हसवडी या घाटातील रस्त्याची दुरवस्था झाली असल्यामुळे वाहतुकीची मोठया प्रमाणात कोंडी होऊन अनेकदा अपघात होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रस्त्याची त्वरीत दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्नांकित रस्ता रस्ते विकास योजना सन २००१-२०२१ नुसार इतर जिल्हा मार्ग क्र.५ दर्जाचा असून त्याची एकूण लांबी ३.०० कि.मी. आहे. सदर रस्त्याच्या ०/०० ते ०/६५० कि.मी. लांबीतील डांबरीकरणाचे काम सन २०१२-१३ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. १/८०० ते २/३००

कि.मी. लांबीतील खडीकरण व २/४०० कि.मी. मध्ये रस्त्याचे कटींग करण्याचे काम सन २०१३-१४ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. ०/६५० ते १/०८५ कि.मी. मधील डांबरीकरणाचे काम सन २०१४-१५ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**श्रीगोंदा तालुक्यात कुकडी बांधकाम वितरण विभाग, कोळवडी अंतर्गत कुकडी नदीच्या कालव्याचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(४) ४३१४५ (३०-०४-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीगोंदा तालुक्यात कुकडी बांधकाम वितरण विभाग कोळवडी अंतर्गत कुकडी नदीच्या कालव्याचे सुरु असलेल्या अस्तरीकरण आणि काँक्रीटीकरण कामात वाळू सिमेंट यासह इतर साहित्य गुणवत्तापूर्व वापरले नसल्याने काम सुरु असतानाच कालव्याला तडे गेले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित ठेकेदार व कंपनीवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०६-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही.
श्रीगोंदा तालुक्यामध्ये कुकडी वितरण बांधकाम विभागामार्फत कोणत्याही प्रकारचे अस्तरीकरणाचे काम सुरु नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शिराळा ते गोंदेगाव (जि.लातूर) या रस्त्याची दुरुस्ती व पूल बांधकाम करण्याबाबत**

**(५) ४७३८८ (२९-०४-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिराळा ते गोंदेगाव (जि.लातूर) रस्त्यांची दुरवस्था झाली असून वाहतुकीस गैरसोयीचे झाल्याने सदर रस्त्याची दुरुस्ती करणे व या रस्त्यावर नवीन पुलाचे बांधकाम करण्याबाबत स्थानिक लोकप्रतीनिधिनी दिनांक ५ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे कार्यकारी अभियंता,जिल्हा परिषद लातूर यांच्याकडे मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची दुरुस्ती व पूल बांधकाम करण्यात आले आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्ता दुरुस्ती व पूल बांधकामास किती खर्च येणार आहे व किती कालावधी लागणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) शिराळा ते गोंदेगाव हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.६८ असून त्याची लांबी ३.८०० कि.मी. आहे. त्यापैकी ०/०० ते १/२७५ कि.मी. लांबीतील डांबरीकरण करुन रस्ता वाहतूक योग्य करण्यात आला आहे. तसेच पुल दुरुस्तीसाठी रु.२.२५ लक्ष मंजूर आहेत.
(३) प्रश्नांकित रस्त्याच्या उर्वरीत १/२७५ ते ३/८०० कि.मी. दुरुस्तीसाठी रु.६३.०० लक्ष खर्च अपेक्षित असून निधीच्या उपलब्धतेनुसार रस्ता दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे भाडगाव ते भाडगाव पाटी रस्ता (ता.जि.लातूर) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(६) ४७५९३ (२९-०४-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे भाडगाव ते भाडगाव पाटी रस्ता (ता.जि.लातूर) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ता दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, रस्ता दुरुस्तीसाठी किती कालावधी लागणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :**(१) होय, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे,
(२) व (३) विषयांकित रस्ता दुरुस्तीचे काम रस्ते देखभाल व दुरुस्ती कार्यक्रम सन २०१६-१७ अंतर्गत प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे. रस्ता दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध होताच काम हाती घेण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे उमाळी ते भाड्गणी (ता.मलकापूर) या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(७) ४७९०१ (०५-०५-२०१६). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर मतदार संघातील मौजे उमाळी ते भाड्गणी हा एकूण ३ कि.मी.लांबीच्या रस्त्याची दुरवस्था झाल्याने येथील नागरीकांची गैरसोय होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याच्या खडीकरण व डांबरीकरणासाठी ७५ लक्ष रुपयांच्या निधीची आवश्यकता असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता जि.पं.बांधकाम विभाग बुलढाणा याना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :**(१) व (२) होय. तथापि सदर रस्त्यावर वाहतुक वर्दळ सुरु आहे.

(३) जिल्हा परिषदेकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) व (५) मलकापूर मतदार संघातील मौजे उमाळी ते मलकापूर हा रस्ता रस्ते विकास योजना सन २००१-२०२१ नुसार इतर जिल्हा मार्ग क्र. ३२ चा भाग रस्ता असून त्याची लांबी ४.०० कि.मी. आहे.

या रस्त्याच्या ४.०० कि.मी. लांबीतील खडीनुतनीकरणाचे काम जिल्हा वार्षिक योजना सन २०१५-१६ अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मंजूर आहे. तसेच ०/०० ते १/०० कि.मी. लांबीतील डांबरीकरणाचे काम रस्ते व पुल दुरुस्ती योजनेअंतर्गत मंजूर असून निविदा प्रक्रिया चालू आहे.

उर्वरीत रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचा जिल्हा परिषदेच्या प्रयत्न राहिल.

---

**पिंपळखुटा महादेव ते जांभूळधाबा आळंद वडजी (ता.मलकापूर) रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(८) ४७९०९ (०५-०५-२०१६). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर मतदार संघातील मौजे पिंपळखुटा महादेव ते जांभूळधाबा आळंद वडजी हा एकूण २ कि.मी.लांबीच्या रस्त्याची दुरवस्था झाल्याने या रस्त्यावरून दुचाकी, चारचाकी वाहन धारकांची, शेतक-यांची व ग्रामस्थांची गैरसोय होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे डांबरीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याच्या डांबरीकरणासाठी ५० लक्ष रुपयांच्या निधीची आवश्यकक्ता असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता जि.पं.बांधकाम विभाग, बुलढाणा याना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६)** :(१) व (२) होय, हे खरे आहे. तथापि सदर रस्त्यावर वाहतुक वर्दळ सुरु आहे.
(३) जिल्हा परिषदेकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(४) व (५) मलकापूर मतदार संघातील मौजे पिंपळखुटा महा. ते जांबुळधाबा आळंद वडजी हा रस्ता सन २००१-२०२१ रस्ते विकास आराखड्यानुसार इतर जिल्हा मार्ग क्र. २७ दर्जाचा असून त्याची लांबी ११.५० कि.मी. आहे. त्यापैकी २/२०० ते ४/२०० या २.०० कि.मी. लांबीचा डांबरीपृष्ठभाग नादुरुस्त असून सदर रस्त्याचे डांबरीनुतनीकरणाचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेचा प्रयत्न राहिल.

---

**मौजे वाघोळा दसरखेड विवरा रणगाव भालेगाव (ता.मलकापूर)**
**या रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(९) ४७९१४ (०५-०५-२०१६). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर मतदार संघातील मौजे वाघोळा दसरखेड विवरा रणगाव भालेगाव हा एकूण ३ कि.मी.लांबीच्या रस्त्याची दुरवस्था झाल्याने नागरीकांची गैरसोय होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याचे डांबरीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याच्या डांबरीकरणासाठी ७५ लक्ष रुपयांच्या निधीची आवश्यक्ता असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता जि.पं.बांधकाम विभाग, बुलढाणा यांना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६)** :(१) व (२) होय, तथापि सदर रस्त्यावर वाहतुक वर्दळ सुरु आहे.
(३) जिल्हा परिषदेकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(४) व (५) मलकापूर मतदार संघातील मौजे वाघोळा-दसरखेड-विवरा-रणगांव-भालेगाव रस्ता सन २००१-२०२१ च्या रस्ते विकास आराखड्यानुसार इतर जिल्हा मार्ग क्र. ३६ असून त्याची लांबी ११.२० कि.मी. आहे.

त्यापैकी रणगाव ते भालेगाव या भाग रस्त्याची लांबी २.२० कि.मी. असून या लांबीचे डांबरी नुतनीकरण करणे आवश्यक आहे. सदरचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेचा प्रयत्न राहिल.

---

**मौजे नवीन दुधलगाव ते रा.मा.क्र. ६ या (ता.मलकापूर) रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(१०) ४७९१९ (०५-०५-२०१६). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर मतदार संघातील मौजे नवीन दुधलगाव ते रा.मा.क्र. ६ हा एकूण २ कि.मी.लांबीचा रस्त्याची दुरवस्था झाल्याने नागरीकांची गैरसोय होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याच्या खडीकरण व डांबरीकरणासाठी ४० लक्ष रुपयांच्या निधीची आवश्यक्ता असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता जि.पं.बांधकाम विभाग बुलढाणा यांना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे. तथापि, सदर रस्त्यावर वाहतुक वर्दळ सुरु आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) अशा प्रकारचे निवेदन बांधकाम विभाग, जिल्हा परिषद बुलढाणाकडे प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(४) व (५) मौजे नवीन दुधलगाव ते रा.मा.क्र.६ रस्त्याची लांबी २.०० कि.मी. असून खडी पृष्ठांकित आहे. त्यापैकी ०/०० ते १/५०० कि.मी. लांबी जळगाव जिल्हा हद्दीत असून उर्वरित ०.५०० कि.मी. लांबी बुलढाणा जिल्हा हद्दीत आहे. जळगाव जिल्ह्यातील लांबीची मैल मजुरांमार्फत देखभाल दुरुस्ती करण्यात येत असून सद्य:स्थितीत दोन्ही जिल्ह्यातील लांबीतील रस्त्यावर वाहतुक वर्दळ सुरु आहे. रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम विविध योजनांमधून जिल्हा परिषदांना प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषद जळगाव व बुलडाणा यांचे नियोजन आहे.

---

### मौजे तेलखेड पोचमार्ग (ता.मलकापूर) रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(११) ४७९२२ (०६-०५-२०१६). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर मतदार संघातील मौजे तेलखेड पोचमार्ग हा एकूण १ कि.मी.लांबीच्या रस्त्याची दुरवस्था झाल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे डांबरीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याच्या डांबरीकरणासाठी ३० लक्ष रुपयांच्या निधीची आवश्यक्ता असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता जि.पं.बांधकाम विभाग बुलढाणा याना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :**(१) व (२) होय. तथापि, सदर रस्त्यावर वाहतुक वर्दळ सुरु आहे.

(३) जिल्हा परिषदेकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) व (५) मलकापूर मतदार संघातील मौजे तेलखेड पोच रस्ता सन २००१-२०२१ रस्ते विकास आरखड्यानुसार ग्रामीण मार्ग क्र. ०५ असून त्याची लांबी २.०० कि.मी. आहे. सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेचा प्रयत्न राहिल.

---

### मौजे नरवेल ते कोटेश्वर मंदिर (ता.मलकापूर) या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(१२) ४७९२५ (०६-०५-२०१६). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर मतदार संघातील मौजे नरवेल ते कोटेश्वर मंदिर हा एकूण २ कि.मी.लांबीच्या रस्त्याची दुरवस्था झाल्याने नागरीकांची गैरसोय होत असल्याची बाब माहे फेब्रुवारी,२०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याच्या खडीकरण व डांबरीकरणासाठी ६० लक्ष रुपयांच्या निधीची आवश्यक्ता असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता जि.पं.बांधकाम विभाग बुलढाणा याना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६)** :(१) व (२) होय, हे खरे आहे. तथापि सदर रस्त्यावर वाहतुक वर्दळ सुरु आहे.

(३) जिल्हा परिषदेकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) व (५) मलकापूर मतदार संघातील मौजे नरवेल ते कोटेश्वर मंदीर हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.८ दर्जाचा असून सदर रस्त्याची लांबी ३.८० कि.मी. आहे. त्यापैकी ०/०० ते १/०० लांबी खडीपृष्ठभागाची आहे. उर्वरित १/०० ते २/०० या लांबीमध्ये खडीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे जिल्हा वार्षिक योजनअंतर्गत मंजूर असून निविदा स्तरावर आहे. तसेच सदर रस्त्यावर सा.क्र. ३/०० मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पुलाचे बांधकाम सुरु आहे.

---

**मौजे भानगुरा ते दसरखेड (ता.मलकापूर) या रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(१३) ४७९२९ (०६-०५-२०१६). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर मतदार संघातील मौजे भानगुरा ते दसरखेड हा एकूण २ कि.मी.लांबीच्या रस्त्याची दुरवस्था झाल्याने नागरीकांची गैरसोय होत असल्याची बाब माहे फेब्रुवारी,२०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याच्या खडीकरण व डांबरीकरणासाठी ५० लक्ष रुपयांच्या निधीची आवश्यकता असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता जि.पं.बांधकाम विभाग बुलढाणा याना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६)** :(१) व (२) होय, हे खरे आहे. तथापि सदर रस्त्यावर वाहतुक वर्दळ सुरु आहे.

(३) जिल्हा परिषदेकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) व (५) मलकापूर मतदार संघातील मौजे भानगुरा ते दसरखेड रस्ता सन २००१-२०२१ च्या रस्ते विकास आराखड्यानुसार ग्रामीण मार्ग क्र. ०९ असून सदर रस्त्याची लांबी ३.७० कि.मी. आहे. सदर रस्त्याच्या ०/०० ते २/०० या लांबीतील खडीकरण झाले असून २/०० ते ३/७०० कि.मी. लांबीतील ११०० मीटर लांबीमधील खडीकरणाचे काम मंजूर आहे.

सदर रस्त्याच्या उर्वरित लांबीतील मजबुतीकरणाचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेचा प्रयत्न राहिल.

---

**मौजे भाड्गणी ते वरखेड रस्त्यांची (ता.मलकापूर) दुरवस्था झाल्याबाबत**

**(१४) ४७९३३ (०६-०५-२०१६). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर मतदार संघातील मौजे भाड्गणी ते वरखेड हा एकूण ३ कि.मी. लांबीच्या रस्त्याची दुरवस्था झाल्याने नागरीकांची गैरसोय होत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे खडीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याच्या खडीकरण ३० लक्ष रुपयांच्या निधीची आवश्यक्ता असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता जि.पं.बांधकाम विभाग बुलढाणा याना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे. तथापि, सदर रस्त्यावर वाहतुक वर्दळ सुरु आहे.

(३) जिल्हा परिषदेकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) व (५) मलकापूर मतदार संघातील भाडगणी ते वरखेड हा रस्ता रस्ते विकास योजना सन २००१-२०२१ नुसार ग्रामीण मार्ग क्र. २८ असून सदर रस्त्याची लांबी ४.०० कि.मी. आहे. त्यापैकी २/०० ते ४/०० कि.मी. लांबीतील खडीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मंजूर असून निविदा स्तरावर आहे.

उर्वरित ०/०० ते २/०० कि.मी. लांबीतील खडीकरणाचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेचा प्रयत्न राहिल.

---

**जिंतूर (जि.परभणी) तालुक्यातील गावामध्ये मंजूर झालेल्या कामांपैकी काही कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(१५) ४८४२३ (३०-०४-२०१६). श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम उपविभाग जिंतूर मार्फत म.ग्रा.रो.ह.यो.अंतर्गत सन २०१३-१४ मध्ये रिडज, वार्घी बोबडे, शेक, गणपूर, जवळा, माक, नागणगाव, गांधळा, पिंपळगाव, गायके व कौसडी (ता.जिंतूर, जि.परभणी) या गावामध्ये विविध कामे मंजूर केलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामांपैकी किती कामांना सुरुवात करण्यात आली, त्यापैकी काही कामे अपूर्णावस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामांच्या रु.०१ कोटी ४२ लक्ष रुपयांच्या देयकांची रक्कम अदा करण्याकरीता तहसिलदार जिंतूर यांनी परवानगी दिलेली नसताना तहसिलदार जिंतूरची स्वाक्षरी नसताना सार्वजनिक बांधकाम विभागातील लिपीक, कनिष्ट अभियंता, तत्कालीन तहसिलदार व डाटा ऑपरेटर यांनी संबंधित गुत्तेदारांशी संगनमत करुन देयक मंजूर करुन घेतल्याबाबतची तक्रार लोकप्रतिनिधींनी सचिव, जलसंधारण विभाग, यांचेकडे दिनांक १६ ऑक्टोबर, २०१५ रोजी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संदर्भात चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(५) असल्यास, तद्नुसार दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (११-११-२०१६) :** (१) व (२) होय.
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सार्वजनिक बांधकाम उप विभाग जिंतूर (जि.परभणी) मार्फत सन २०१३-१४ मध्ये एकूण ४० कामे घेण्यात आली असून त्यापैकी १३ कामे पूर्ण तर २७ कामे अपूर्ण आहेत.
(३) सदर प्रकरणी संबंधित लोकप्रतिनिधी यांनी सचिव (रोहयो व जलसंधारण) यांच्याकडे दि.२० ऑक्टोबर, २०१५ रोजी तक्रार सादर केली होती.
(४) व (५) होय.
सदर प्रकरणाची चौकशी उपविभागीय अधिकारी, सेलू यांच्यामार्फत करण्यात आली आहे. सदर चौकशीत याप्रकरणी सकृतदर्शनी अनियमितता झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्ह्यातील ४०० ग्रामपंचायतीत दिलेल्या अनुदानामध्ये तीन कोटी रुपयांचा अपहार झाल्याबाबत**

**(१६) ४८५५० (२९-०४-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यातील ४०० ग्रामपंचायतीमध्ये शासनाने दिलेल्या अनुदानामध्ये सुमारे तीन कोटी रुपयांचा अपहार झाल्याचे लेखापरिक्षणात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०९-२०१६) :**(१) होय हे खरे आहे.

सांगली जिल्हा सन १९८९-९० ते २००६-०७ पर्यंत या कालावधीत स्थानिक निधी लेखा यांचेकडून झालेल्या लेखा परीक्षणामध्ये आढळलेली एकूण ३९१ गंभी प्रकरणे प्राप्त झाली होती. या प्रकरणामध्ये एकूण रक्कम रु.५,३९,२९,५२८/- इतकी रक्कम गुंतलेली होती.

(२) व (३) स्थानिक निधी लेखा यांचेकडून झालेल्या लेखा परीक्षणामध्ये आढळलेली एकूण ३९१ गंभीर प्रकरणे प्राप्त झालेली हाती. त्यांपैकी २११ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून रक्कम रु.१,८८,०२,९२२/- इतकी वसूल व पूर्तता झालेली आहे.

एकूण १४ प्रकरणे ही दुबार असून त्यामध्ये रक्कम रु.३,५४,२९२/- इतकी गुंतलेली आहे. तसेच स्थानिक निधी लेखा यांचेकडून १९ प्रकरणे अपूर्ण माहितीच्या स्वरुपात प्राप्त झालेली आहेत. त्याची रक्कम रु.२४,३६,११४/- इतकी दाखविण्यात आलेली आहे. सदर दुबार अपूर्ण माहिती प्रकरणे स्थानिक निधी लेखा यांना वगळणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

एकूण ३१ प्रकरणामध्ये जबाबदार ग्रामसेवक हे मयत झालेले असून त्यामध्ये रक्कम रु.३१,७३,६६१/- इतकी गुंतलेली आहे. सदर प्रकरणात नियमानुसार कार्यवाही सुरु आहे.

उर्वरित ११६ प्रकरणे रक्कम रु.२,९१,६२,५६९/- इतकी रक्कम गुंतलेली असून त्यामध्ये सेवानिवृत्त ग्रामसेवक यांचा समावेश आहे. सदर प्रकरणाबाबत फौजदारी गुन्हा दाखल करणे, महसूली थकबाकीप्रमाणे वसूल करणे, वेतनातून व सेवानिवृत्ती नंतरच्या देय रक्कमेतून वसूली करणेची कार्यवाही प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बुलढाणा जिल्हयात दारीद्र रेषेखालील प्रमाणपत्र वाटप करण्याबाबत

**(१७) ४८६३० (०६-०५-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय ग्रामीण मंत्रालयाच्या माहे मार्च, २०१० मधील आदेशाप्रमाणे राज्यात सन २०११ साली दारीद्र रेषेखालील कुटुंबाची जनगणना करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त जनगणना बुलढाणा जिल्हयात पुर्ण झाली आहे काय व त्यामध्ये दारीद्र रेषेखालील किती कुटूंबे आढळुन आली,

(३) तसेच किती कुटूंबाना दारीद्र रेषेखालील प्रमाणपत्र वाटप करण्यात आली असून वाटप करावयाचे बाकी असलेले प्रमाणपत्र वाटण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०९-२०१६) :**(१) सचिव, केंद्रीय ग्रामीण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक ३०.५.२०११ च्या पत्रास अनुसरुन, राज्यात ऑक्टोबर, २०११ पासून सामाजिक, आर्थिक व जात निहाय सर्वेक्षण कार्यक्रम २०११ राबविण्यात आले आहे.

(२) व (३) सामाजिक आर्थिक व जात निहाय सर्वेक्षण कार्यक्रम, २०११ अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यात कुटुंबनिहाय क्षेत्रीय सर्वेक्षण करण्यात आले आहे. यामध्ये क्षेत्रीय स्तरावर संकलित माहिती केंद्र शासनास सादर करण्यात आली आहे. केंद्रीय ग्रामीण मंत्रालयामार्फत या कार्यक्रमांतर्गत प्राप्त माहितीचे संस्करण व पृथक्करण केल्यानंतर केंद्र शासनाच्या सूचनेनुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील जिल्हा परिषद अंतर्गत पशु वैद्यकीय रुग्णालयाच्या दुरुस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(१८) ४९०८३ (२५-०४-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील जिल्हा परिषद अंतर्गत पशु वैद्यकीय रुग्णालयाच्या दुरुस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे करुन लाखो रुपयांच्या निधीचा ठेकेदाराने अधिकाऱ्यांशी संगनमत करुन अपहार केल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास सामाजिक कार्यकर्त्याने निदर्शनास आणला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गैरव्यवहाराची जिल्हा परिषदेने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.
पशु वैद्यकीय रुग्णालयाच्या दुरुस्तीच्या कामाची प्रशासकीय मान्यता रु. ५ लाखांची देण्यात आलेली आहे. सदर तरतूदीच्या मर्यादेत दुरुस्तीचे व पुर्नविद्युतीकरणाची कामे पुर्ण करण्यात आली आहे.
(२) व (३) नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्हा परिषदेत अनेक पदे रिक्त असल्याबाबत**

**(१९) ४९३९५ (०३-०५-२०१६). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्याची निर्मिती होऊन दिड वर्ष पूर्ण होऊनही अद्याप अनेक बाबींची पुर्तता बाकी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघरच्या वाट्याचे गट क आणि ड चे सुमारे १११ कर्मचारी अजूनही ठाणे जिल्हा परिषदेत अनेक पदे रिक्त असून जिल्हा परिषदेमधील कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण पडत असल्याने आमचे कर्मचारी उपलब्ध करुन द्या अशी मागणी पालघर जिल्हापरिषदेकडून होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पालघर जिल्ह्याच्या विकासासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) शासन स्तरावरुन समायोजनाचे धोरण निश्चित करुन आदेश काढण्यात आले आहेत.
(४) शासनाचे दिनांक २९ फेब्रुवारी, २०१६ चे शासन निर्णयान्वये समायोजनाची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागात सार्वजनिक बांधकाम विभाग, पंतप्रधान ग्रामसडक योजना व जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आलेल्या कामांचे परीक्षण करण्याबाबत**

**(२०) ४९४९० (२८-०४-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यात ग्रामीण भागात सुरु असलेल्या रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाचे झाले असल्याबाबतच्या तक्रारीच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभाग, पंतप्रधान ग्रामसडक योजना व जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आलेल्या वर्षभरातील व सुरु असलेल्या रस्त्यांच्या कामाचे परीक्षण करण्याचा निर्णय शासनाने माहे फेब्रुवारी, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०९-२०१६) :**(१), (२) व (३) प्रश्न भाग १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अशा प्रकारचा निर्णय घेण्यात आलेला नाही.

तथापि, ग्रामीण भागात सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रस्ते बांधणी करताना दक्षता व गुणनियंत्रक मंडळामार्फत रस्त्याच्या गुणवत्तेची तपासणी करण्यात येते. प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांची गुणवत्ता तपासणी या योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यकारी अभियंता, प्रमंग्रासयो, राज्य गुणवत्ता नियंत्रक व राष्ट्रीय गुणवत्ता

नियंत्रक अशा त्रिस्तरीय पध्दतीने करण्यात येते. तर जिल्हा परिषदेमार्फत देखभाल दुरुस्ती करण्यात येणाऱ्या रस्त्यांच्या कामाची तपासणी जिल्हा परिषदेने कशी करावी यांच्या सूचना दिनांक १०.०९.२०१२ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या आहेत. त्यामध्ये काम सुरु असताना व पूर्ण झाल्यावर संबंधित कंत्राटदार यांनी तपासणी केल्यावर,

(१) जिल्हा परिषदेच्या शाखा अभियंता (बांधकाम विभाग) व उप अभियंता (बांधकाम विभाग) यांनी त्याची तपासणी करावी.

(२) काही निवडक कामाची तपासणी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम विभाग) यांनी करावी.

(३) जेथे तक्रार येईल तेथे कामाची संयुक्त तपासणी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग) यांच्या समवेत करावी, अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तद्वत: एक त्रयस्थ मंडळ म्हणून प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या धर्तीवर तपासणी करण्याकरिता प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या उपलब्ध असलेल्या राज्यस्तरीय गुणवत्ता नियंत्रक यांच्याकडून ही तपासणी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना करुन घेता येवू शकते.

---

**महिला बालकल्याण विभागातील एकात्मिक बालविकास योजने अंतर्गत कार्यरत असणाऱ्या पर्यवेक्षिकांना पदोन्नतीपासून वंचित असल्याबाबत**

**(२१) ४९५८९ (३०-०४-२०१६). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला बालकल्याण विभागातील एकात्मिक बालविकास योजने अंतर्गत कार्यरत असणाऱ्या पर्यवेक्षिकांना पदोन्नतीचा लाभ दिला जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सलग ३०-३० वर्षे सेवा करूनही पर्यवेक्षिका पदोन्नतीपासून वंचित राहिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पदोन्नती संदर्भात केलेल्या अन्यायाविरूध्द अंगणवाडी पर्यवेक्षिका संघटनेच्या वतीने वेळोवेळी मागणी, आंदोलने केली जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार या पर्यवेक्षिकांना पदोन्नती देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-१०-२०१६) :**(१) नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) होय.

(४) सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**शिर्डी (ता.राहता, जि.अहमदनगर) येथील भंडारदरा धरणातून जायकवाडी धरणाच्या पाण्याचा दुरुपयोग होत असल्याबाबत**

**(२२) ४९७२४ (२९-०४-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिर्डी (ता.राहता, जि.अहमदनगर) येथील भंडारदरा धरणातून जायकवाडी धरणात पिण्यासाठी पुरेसा पाणीसाठा आहे गोदावरी मराठवाडा सिंचन विकास महामंडळाने तेथे पिण्यासाठी नेमक किती पाणी लागते, याबाबत तीन वेळा वेगवेगळी आकडेवारी सादर केली तेथील पाण्याचा केवळ पिण्यासाठीच नाही तर अन्य कारखान्यांसाठी अनिर्बंध वापर सुरु आहे तर वरच्या बाजूच्या शेतीचे पाण्याअभावी नुकसान होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भंडारदरा धरणातून जायकवाडीसाठी मुळा, दारणा, गंगापूर ही धरणे यापूर्वी रिकामी करण्यात आली आहेत जायकवाडीसाठी सोडलेले पाणी पिण्यासाठी वापरले जाते की नाही याबाबत राज्याच्या मुख्य सचिवांनी दुर्लक्ष केल्याने न्यायालयाने यासंदर्भात नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-०८-२०१६) :**(१) नाही.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या दि.१९/०९/२०१४ रोजीच्या निर्णयानुसार गोदावरी खोऱ्यातील जायकवाडीच्या उर्ध्व भागातील धरण समुहातील व जायकवाडी धरणातील दि.१५/१०/२०१५ रोजीच्या पाणी साठ्याचा विचार करुन गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाने दि.१७/१०/२०१५ अन्वये समन्यायी पाणी वाटपाचे आदेश निर्गमित केले आहेत.

समन्यायी पाणी वाटपासंदर्भाम महामंडळाच्या आदेशास आव्हान करणाऱ्या विविध जनहित याचिका मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आल्या आहेत. मा.न्यायालयाच्या निर्देशानुसार उर्ध्व गोदावरी खोऱ्यातील धरण समुहातील जायकवाडीसाठी प्राप्त पाणी पिण्यासाठीच वापरण्यात येत आहे.

वरच्या बाजुच्या शेतीचे पाण्याचे नियोजन उपलब्ध पाण्यानुसार करणेत येते. दि.०७/०९/२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार जलाशयातील सर्व पाणी साठे अत्यंत कमी असल्याने पिण्यासाठी राखीव करण्यात आले असून त्या पाण्याचे नियोजन मा.विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांचे आदेशानुसार करण्यात येत आहे.

(२) महामंडळाच्या दि.१७/१०/२०१५ च्या समन्यायी पाणी वाटपाच्या आदेशानुसार दि.०१/११/२०१५ ते दि.२८/११/२०१५ या कालावधीत उर्ध्व गोदावरी भागाकडील धरण समुहातून १०.४० टी.एम.सी. पाणी जायकवाडी धरणासाठी सोडण्यात आले असून त्यापैकी ६.६३ टी.एउम.सी. पाणी जायकवाडीत प्रत्यक्ष प्राप्त झाले आहे. जायकवाडीत प्राप्त झरालेले पाणी पिण्यासाठी वापरले जात आहे किंवा कसे हे पाहण्याची जबाबदारी राज्याच्या मुख्य सचिवांवर

मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी सोपविली आहे व त्यानुषंगाने आवश्यक सर्व उपाययोजना करण्यात येऊन यथायोग्य संनियंत्रण करण्यात आले आहे. या संदर्भात मा.न्यायालयाने नाराज व्यक्त केलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगरुळपीर (जि.वाशिम) तालुक्यातील सोनल सिंचन प्रकल्पाच्या शेती सिंचनाबाबत**

**(२३) ४९८१९ (३०-०४-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगरुळपीर (जि.वाशिम) तालुक्यातील सोनल सिंचन प्रकल्पाच्या शेती सिंचनाबाबत गंभीर समस्या असताना लघु पाटबंधारे विभागाने शेतकऱ्यांच्या सिंचनाच्या नावाने सन २००१ पासून कागदोपत्री देखभाल-दुरुस्ती व नविन कामे दाखवून शासनाच्या कोटयवधी रुपयांची लूट केली असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आहे,

(३) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-१०-२०१६) :**(१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रामीण भागात बायोगॅसच्या लाभार्थांची संख्या वाढवून अनुदान देण्याबाबत**

**(२४) ४९८६० (३०-०४-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागड्या इंधनाच्या तुलनेत बायोगॅस स्वयंपाकासाठी उपयुक्त ठरणारा असून ग्रामीण भागात बायोगॅसची संकल्पना रुजत असली तरी नकारात्मक मानसिकतेमुळे त्यांची संख्या कमी असल्याने गॅसदरात वाढ करुन त्याला अनुदान देण्यात येते मात्र शासनाकडून बायोगॅस बांधण्यासाठी देण्यात येणारे अनुदान अत्यल्प असून यात वाढ झालेली नसल्याचे दिनांक १५ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बायोगॅसचे लाभार्थींची संख्या वाढण्यासाठी व त्यास अनुदान देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०९-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

माहे मार्च व एप्रिल २०१६ मध्ये बायोगॅस सयंत्र बांधण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ करण्याबाबतची निवेदने शासनाकडे प्राप्त झाली आहेत.

(२) केंद्र शासनाकडून प्रतिवर्षी निर्गमित केल्या जाणाऱ्या प्रशासकीय मंजूर आदेशातील मार्गदर्शक सुचनांनुसार, बायोगॅस व खत व्यवस्थापन कार्यक्रम राज्यात राबविण्यात येतो. केंद्र शासनाने दिनांक ३० जून, २०१४ व त्यानुसार या विभागामार्फत दिनांक ०७ फेब्रुवारी, २०१५ रोजी नवीन सुधारित प्रशासकीय मंजूरीचे आदेश निर्गमित केले असून त्याअन्वयचे बायोगॅस संयंत्रासाठी अनुदानाचे दर सुधारित केलेले आहेत. बायोगॅस उभारणीचे उद्दिष्टे क्षेत्रीय स्तरावरुन मागवून ते केंद्र शासनाकडे पाठविण्यात येते. त्यानुसार केंद्र शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान लाभार्थ्यांना वितरीत करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गिरगांव (ता.नागभीड, जि.चंद्रपूर) ग्रामपंचायतीअंतर्गत नवानगर गावात मुलभूत सुविधा देण्याबाबत

**(२५) ५०१७२ (३०-०४-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरगांव (ता.नागभीड, जि.चंद्रपूर) ग्रामपंचायतीअंतर्गत नवानगर गावात वीज, पिण्याच्या पाण्याची समस्या, मुलांसाठी अंगणवाडी केंद्र नाही,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावाला मूलभूत सुविधा अद्यापपर्यंत न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या गावाला तातडीने मुलभूत सुविधा देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०९-२०१६) :**(१), (२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

गिरगाव ग्रामपंचायत अंतर्गत नवानगर ही २८ कुटूंबांची वन विभागाच्या शासकीय जागेवर वसलेली ११२ इतक्या लोकसंख्येची वस्ती आहे. सदर वस्तीमध्ये पिण्याच्या पाण्याकरीता १ हातपंप असून १४ वा वित्त आयोगांतर्गत सौर उर्जेवर आधारीत नळ योजना प्रस्तावित करण्यात आली आहे. सदर वस्तीत वीजेच्या व्यवस्थेबाबत गट विकास अधिकार, पंचायत समिती नागभिड यांचे स्तरावरुन ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. तसेच, सदर वस्तीमध्ये अंगणवाडी नाही. तथापि, गिरगाव येथील अंगणवाडीमार्फत महिला व मुलांना सुविधा देण्यात येत आहेत.

---

**अमरावती जिल्ह्यातील ग्रामसेवकांना सुरक्षा व निवृत्तीवेतन देण्याबाबत**

**(२६) ५०३८५ (२८-०४-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात महाराष्ट्र रोजगार हमी योजनेसारख्या कामाची जबाबदारी ग्रामसेवकावर देण्यात आली असल्यामुळे गावात दोन गटात तंटे निर्माण होणे तर दुसरीकडे बांधकाम विभाग ग्रामसेवकाकडे दिल्याने त्यांना ग्रामस्थांच्या रोषाला बळी पडावे लागणे व कामाचा अतिरिक्त ताण पडत असल्याने मानसिक तणावातून गेल्या ६ वर्षात ३१ ग्रामसेवकांच्या आत्महत्या व ५३ जणांवर प्राणघातक हल्ले झाले असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच ग्रामसेवक यांना सेवा निवृत्त झाल्यावर त्यांना निवृत्तीवेतन देखील मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती ग्रामसेवकांना सुरक्षा व निवृत्तीवेतन मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-०१६०) :**(१) नाही.

(२) नाही. सन २००९ ते २०१५ या कालावधीत एकुण ६७ ग्रामसेवक सेवानिवृत्त झाले त्यापैकी ५२ ग्रामसेवकांचे नियमित सेवा निवृत्तीवेतन मंजूर करण्यात आले व १५ ग्रामसेवकांना त्यांच्या खाते चौकशीच्या अधिन राहून तात्पुरते सेवानिवृत्ती वेतन मंजूर करण्यात आले आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोयगाव (जि.औरंगाबाद) तालुक्यात घरकुल लाभार्थ्यांना देण्यात आलेला निधी कामाअभावी पडून असल्याबाबत**

**(२७) ५१०२५ (२५-०४-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोयगाव (जि.औरंगाबाद) तालुक्यात घरकुल लाभार्थ्यांचे १ कोटी ३२ लाख रुपये निधी सन २०१२-२०१५ अखेरीस असून कामा अभावी पडून असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घरकुल लाभार्थ्यांनी निर्धारित वेळेत काम करावीत यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :**(१) होय.

लाभार्थी स्वत: बांधकाम करीत असल्याने बांधकामाच्या प्रगतीनुसार निधी वितरणाची कार्यवाही सुरु आहे. हा निधी घरकुलाच्या कामाअभावी शिल्लक राहिला नसून लाभार्थी घरकुलाचे कामे जसजसे पुर्ण करत आहेत तसा खर्च होत आहे.

(२) लाभार्थ्यांचे पंचायत समिती स्तरावर बैठका/मेळावे घेण्यात आलेले आहेत. अपूर्ण असलेली घरकुले पुर्ण करण्यासाठी लाभार्थ्यांना प्रवृत्त करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची कामे सुरु करण्याबाबत

**(२८) ५१०३९ (१२-०५-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यात येथे तीव्र दुष्काळी परिस्थिती असतानाही पंचायत समिती कृषी विभाग सामाजिक वनीकरण हे विभाग वगळता अन्य विभांगानी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची कामे सुरु केली नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मजूरांच्या हाताला कामे देण्यासाठी इतर विभागानेही महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची कामे सुरु करावीत यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१७-०९-२०१६) :**(१) होय, अंशत: खरे आहे.

सिल्लोड तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत जानेवारी, २०१६ मध्ये ग्रामपंचायत, कृषी विभाग व सामाजिक वनीकरण विभागामार्फत कामे सुरु होती.

(२) सिल्लोड तालुक्यामध्ये मग्रारोहयो अंतर्गत मजूरांना कामे उपलब्ध करुन देण्याकरीता सध्या ५४३२ कामे शेल्फवर आहेत. त्यामध्ये प्रत्येक ग्रामपंचायतीस ०५ कामाचा शेल्फ आहे.

जिल्हाधिकारी औरंगाबाद कार्यालयाने मग्रारोहयो अंतर्गत सर्व यंत्रणाना यंत्रणानिहाय मजूरांच्या मागणी प्रमाणे कामे उपलब्ध करुन देण्याचे वेळोवेळी कळविले आहे.

तसेच उपविभागीय अधिकारी सिल्लोड यांच्या अध्यक्षतेखाली वेळोवेळी बैठका घेऊन तालुका स्तरीय यंत्रणा प्रमुख अधिकारी यांना कामे उपलब्ध करुन देण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### किनवट (जि.नांदेड) येथील पंचायत समिती बांधकामात झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(२९) ५१४४३ (०६-०५-२०१६). श्री.प्रदीप नाईक (किनवट) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट (जि.नांदेड) येथील आदिवासी प्रवण क्षेत्रातील असलेल्या पंचायत समिती बांधकामाचे अंदाजपत्रकात चुकीचे नोंदी व वस्तुस्थिती व स्थळ पाहणी न करता अंदाजपत्रक करण्यात आल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) पंचायत समितीचे बांधकाम करताना मुख्य रस्त्यापासून उंचीवर बांधकाम करण्याऐवजी रस्त्यापासून ५ फुट खाली बांधकाम केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :**(१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) या प्रकरणी चौकशी करण्यात आलेली असून तक्रारीत तथ्य नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### परभणी येथे वृक्षरोप खरेदीसाठी ग्रामपंचायतकडून घेतलेल्या निधीचा गैरवापर केल्याबाबत

**(३०) ५२१०२ (०५-०५-२०१६). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील वृक्षरोप खरेदीसाठी ७८ ग्रामपंचायतीकडून घेतलेल्या रु.१७,४९,८२०/- रुपयाच्या गैरव्यवहार प्रकरणी नेमलेल्या चौकशी समितीने आपला अहवाल तयार केला आहे काय,

(२) असल्यास, चौकशी समितीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधितांविरुध्द काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :**(१) होय.

(२) चौकशी अहवालानुसार ७८ ग्रामपंचायतींपैकी २९ ग्रामपंचायतींना रु.७,१३,१२०/- रक्कमेचे धनादेश देऊनही संबंधित नर्सरीकडून रोपे मिळालेली नाहीत. त्यापैकी २ ग्रामपंचायतींचे धनादेश वटले नसल्याने रु.४०,०००/- संबंधित ग्रामपंचायतीच्या खात्यातच जमा आहेत. ग्रामपंचायत

झरी, ता.परभणी यांनी नर्सरीकडून रोपे व दिलेल्या धनादेशाची रक्कम रु.७०,०००/- परत न मिळाल्याबाबत संबंधित नर्सरी विरुध्द मा.न्यायालयात प्रकरणे दाखल केले आहे. उर्वरित रु.६,०३,१२०/- व त्यावरील व्याज रु.४५,९२०/- असे एकूण रु.६,४९,०४०/- नर्सरीकडून वसूल करुन संबंधित ग्रामपंचायतीच्या खात्यात जमा करण्यात आले आहेत.

चौकशी अहवालाच्या अनुषंगाने सदर प्रकरणी श्री.एस.एन.गोपाळ, तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परभणी यांचे विरुध्द विभागीय आयुक्त यांचेकडे दोषारोप पत्र सादर करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मेळघाट धारणी येथील चाकर्दा उतावली येथील रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३१) ५२१५० (२८-०४-२०१६). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट धारणी येथील चाकर्दा उतावली येथील मोठ्या प्रमाणात रस्त्याची दुरवस्था झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :**(१) अंशतः खरे आहे. तथापि सदर रस्त्यावर वाहतूक सुरु आहे.

(२) ते (४) उतावली चाकर्दा हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.१८ असून रस्त्याची लांबी ५/८०० कि.मी. आहे. या रस्त्याची जिल्हा परिषदेमार्फत पहाणी करण्यात आली असून रस्त्याचे पृष्ठभागाला खड्डे पडलेले आहेत.

प्रश्नांकित रस्त्याच्या सुधारणेचे काम जिल्हा वार्षिक योजना सन २०१६-१७ करीता प्रस्तावित करण्यात आले असून निधीच्या उपलब्धतेनुसार सदरचे काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

---

**चिखलदरा (जि.अमरावती) कोमटी जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतील शिक्षक सतत गैरहजर राहत असल्याबाबत**

**(३२) ५२१५१ (२६-०४-२०१६). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखलदरा (जि.अमरावती) कोमटी जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतील शिक्षक सतत गैरहजर राहत असल्यामुळे मुलांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सरपंच व गावातील मंडळीनी दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास शाळेला भेट दिली असता ७ पैकी ५ शिक्षिका गैरहजर होत्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने गैरहजर शिक्षकांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०९-२०१६) :**(१) नाही.
(२) होय.
(३) व (४) गावच्या सरपंचानी दिलेल्या भेटीवेळी ७ शिक्षकापैकी शिक्षक उपस्थित होते व दोन शिक्षक रजेवर होते. उर्वरित तीन शिक्षकांपैकी एक शिक्षिका आजारी असल्याने दोन शिक्षिका त्यांना मुळ गावी सोडण्यास गेलेल्या होत्या. सदर प्रकरणी केलेल्या चौकशीवेळी शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक वरिष्ठाची कोणतीही परवानगी न घेतला शाळेत उपस्थित राहत नसल्याचे तसेच शाळेतील कर्मचाऱ्यांवर कोणतेही नियंत्रण नसल्याचे स्पष्ट झाल्याने प्रभारी मुख्याध्यापक यांची दि. १/७/२०१६ ची एक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम न करता रोखण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बावधन (ता.हवेली, जि.पुणे) येथील ऑरेजसृष्टी व पेबलस या सोसायटींना सर्व मुलभूत सुविधा मिळण्याबाबत**

**(३३) ५२३७३ (२९-०४-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बावधन (ता.हवेली, जि.पुणे) येथील ऑरेजसृष्टी व पेबलस या सोसायटी अधिकृत असून येथे रहिवाशी मागील दोन वर्षापासून राहत आहेत, त्यांनी मालमत्ता कर घेण्यासाठी सरपंच बावधन यांचेकडे वारंवार मागणी करण्यात येवुनही सरपंच बावधन यांनी मालमत्ता कराची रक्कम घेण्यास नकार दर्शविला असून ते या उपरोक्त सोसायटींना कोणतीही सुविधा देत नसल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सरपंच बावधन यांनी मालमत्ता कराची रक्कम स्वीकारण्याबाबत तसेच या सोसायटींना सर्व मुलभूत सुविधा मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

दिनांक ०६/०४/२०१५ ते दिनांक ०२/०१/२०१६ या कालावधीत मालमत्ता कर आकारणी व वसुलीस शासनाकडून स्थगिती देण्यात आलेली असल्यामुळे सदरील कालावधीत ग्रामपंचायत बावधन यांना मालमत्ता कराची आकारणी व वसुली केलेली नाही. तथापि, दिनांक ०२/०१/२०१६ पासून ऑरेंजसृष्टी व पेबलस या दोन्ही सोसायट्यांमधील मालमत्तांवर मालमत्ता कराची आकारणी व वसुली करण्यात येत आहे.

दोन्ही हौसिंग सोसायटींना ग्रामपंचायतीमार्फत सार्वजनिक रस्ते, स्ट्रिट लाईट, दैनंदिन स्वच्छता या सुविधा पुरविण्यात येत आहेत.

तथापि, ग्रामपंचायत बावधन बुद्रुक ही पुणे महानगरपालिकेच्या हद्दीलगतची ग्रामपंचायत असून, गावात फक्त पुणे महानगरपालिकेकडून होणारा पाणीपुरवठा हा एकमेव पाणीपुरवठ्याचा स्त्रोत असल्याने व झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येच्या प्रमाणात पुणे महानगरपालिकेकडून पाणीपुरवठा होत नसल्याने तसेच, तीव्र पाणी टंचाईमुळे संबंधित सोसायटींना पुरेसा पाणीपुरवठा करणे ग्रामपंचायत बावधन बुद्रुक यांना शक्य होत नाही. तथापि, सदर सोसायटींन पाणीपुरवठा व इतर सर्व मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत ग्रामपंचायत सदैव प्रयत्नशील आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील दारिद्रयरेषेमधील लाभार्थी घरकुल योजनेपासून वंचित असल्याबाबत**

**(३४) ५२४३१ (२६-०४-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील तब्बल १०४५ इतके दारिद्रयरेषेमधील लाभार्थी घरकुल योजनेपासून वंचित असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :**(१) होय.

सन २०१५-१६ च्या उद्दिष्टानुसार घरकुलांना मंजूरी दिल्यानंतर आजमितीस इतर प्रवर्गाच्या १०२९ लाभार्थ्यांना घरकुल मंजूर होणे बाकी आहे.

(२) होय.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार प्राप्त होणाऱ्या उद्दिष्टापैकी अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमातीसाठी ६० %, अल्पसंख्यांक १५%, अपंग ३% व उर्वरीत इतर प्रवर्गास वाटप करावे लागते. दरवर्षी प्राप्त होणाऱ्या उद्दिष्टामधून प्रतिक्षा यादीतील लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देण्यात येतो. प्रतिक्षा यादीतील लाभार्थ्यांची संख्या जास्त असल्यामुळे आजमितीस १०२९ लाभार्थ्यांना घरकुल मंजूर होणे बाकी आहे.

(३) प्रत्येक वर्षी प्राप्त उद्दिष्टांच्या प्रमाणात लाभार्थ्यांना घरकुलांचा लाभ देण्यात येतो.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हा परिषदेकडून राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक आणि सार्वजनिक लाभांच्या योजना लाभार्थ्यांना मिळत नसल्याबाबत**

**(३५) ५२४३५ (२८-०४-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हा परिषदेकडून राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक आणि सार्वजनिक लाभांच्या योजना वर्ष संपत आले तरी असंख्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचलेल्या नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या लाभार्थ्यांना शासनाच्या योजनांचा लाभ न मिळण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) पात्र निविदाकारांकडून प्रतिसाद मिळाला नसल्याने ई-निविदा प्रक्रिया होणेस विलंब झाला. मार्च अखेर पुरवठारांकडून साहित्य प्राप्त झाले असून लाभार्थ्यांना साहित्य वाटपाचे काम सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे जातेगांव (ता.गेवराई, जि.बीड) विहीरींच्या पाण्याचा दुरुपयोग होत असल्याबाबत**

**(३६) ५२५०१ (३०-०४-२०१६). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे जातेगांव (ता.गेवाराई, जि.बीड) येथे दिनांक १६ जानेवारी, २०१६ रोजी पाणी आणण्यासाठी कु.कोमल उकनाथ जगताप ही विहीरींवर गेली असता तिचा विहीरीत पडून मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील गावातील ग्रामपंचायत अंतर्गत सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या दोन विहीरी व पाणींपुरवठा योजना कार्यान्वित असूनही संपूर्ण गावास पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत नाही तसेच सदरील विहीरीचे पाणी सरपंच व माजी सरपंच यांनी स्वत:च्या शेतीसाठी वापरत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीनुसार सरपंच, माजी सरपंच व ग्रामसेवक यांच्यावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०९-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही. दुष्काळाच्या कालावधीत गावातील दोन्ही विहिरींमध्ये पाण्याची आवक कमी झाल्यामुळे पाणी उपलब्ध होत नव्हते त्यामुळे गावाला टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत होता.

या प्रकरणाची अधिक चौकशी करण्यात आली असता सदर विहिरींच्या पाण्याचा गावाचे सरपंच व माजी सरपंच हे स्वत:च्या शेतीसाठी वापर करीत नसल्याचे आढळून आले.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) विलंब झालेला नाही.

---

**ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत**

**(३७) ५२५२६ (०६-०५-२०१६). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे व सातारा जिल्हा श्रमिक संघ सलंग्न पुणे जिल्हयातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची विविध मागण्यासाठी विभागीय आयुक्त व जिल्हा परिषद कार्यालयावर मोर्चा काढला होता, हे खरे आहे
काय,

(२) असल्यास, जिल्हयातील कर्मचाऱ्यांसाठी सुमारे १० कोटी १७ लाख ६७ हजार रुपये मंजूर झालेले आहेत परंतु ही रक्कम अद्याप कर्मचाऱ्यांच्या हाती पडलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चतुर्थ वर्गाची वेतनश्रेणी देण्यात यावी तसेच पेन्शन योजना, विमा योजना, ग्रॅज्युइटी, आदींची अंमलबजावणी करावी व इतर विविध मागण्या करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हयातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना सन २०१५-१६ मधील शासनाकडून देण्यात येणारे अनुदान जिल्हा परिषद, पुणे यांचेमार्फत सर्व गट विकास अधिकारी यांना वितरित करण्यात आले असून सदर अनुदान पंचायत समिती मार्फत ग्रामपंचायतींनाही वितरित करण्यात आले आहे.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ नुसार ग्रामपंचायत ही स्वायत्त संस्था असून तीचे कर्मचारी पूर्णत: ग्रामपंचायतीचे कर्मचारी असून शासनाचे किंवा जिल्हा परिषदेचे कर्मचारी नाहीत. सदर अधिनियमातील कलम ६१ अन्वये ग्रामपंचायतीची कर्तव्ये पार पाडण्यासाठी सेवकांची नेमणूक करण्याची तरतूद आहे. शासन निर्णय दि.२१.१.२००० अन्वये ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध आणि शासन निर्णय दि.४.३.२०१४ अन्वये किमान वेतन निश्चित करण्यात आलेले आहे. ग्रामपंचायतीच्या उत्पन्नानुसार किमान वेतनाचे अनुदान शासनाकडून वितरीत करण्यात येते. सद्यस्थितीत ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना चतुर्थश्रेणी वेतनश्रेणी, पेन्शन योजना, विमा योजना लागू करण्याची बाब विचाराधीन नाही.

शासन परिपत्रक दिनांक १८ ऑगस्ट, २००१ नुसार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना उपदान नियम १९७२ लागू करण्यात आला आहे. विविध मागण्यांबाबत अधिनियम व नियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येते. तसेच इतर मागण्यांबाबत बैठक आयोजित करण्याबाबत प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाने तीन कोटी रुपयांच्या निधीचे समायोजन केल्याबाबत**

**(३८) ५२७१५ (०६-०५-२०१६). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाने तीन कोटी रुपयांच्या निधीचे अद्याप समायोजन केले नसल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा निधी माहे मार्च, २०१६ पर्यंत खर्च न झाल्यास हा निधी व्यपगत होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचा निधी अद्यापपर्यंत खर्च न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०९-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

समायोजन न केल्याची रक्कम रु. ३ कोटी नसून फक्त रु. २७ लक्ष इतकी आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

सदर निधी कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या अग्रिमाची रक्कम असून ती अग्रिम घेणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतनातून वसूल करण्याची तसेच मयत कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या अग्रिमाचे निर्लेखन करण्याची कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे भांडेवाडी (ता.खटाव, जि.सातारा) येथील गट क्र.४०९**
**मध्ये रस्त्यावर अतिक्रमण झाल्याबाबत**

**(३९) ५२८५८ (०३-०५-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खटाव तालुक्यातील (जि. सातारा) मौजे भांडेवाडी येथील गट क्र. ४०९ या शहरातील रस्त्यावर मौ. भांडेवाडीचे विद्यमान सरपंच यांनी अतिक्रमण केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तहसिलदार खटाव (वडूस) तसेच गटविकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती खटाव यांच्याकडे अतिक्रमणाबाबत दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास ग्रामस्थांनानी लेखी तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याबाबत व दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०९-२०१६) :**(१) गट क्र. ४०९ मध्ये अतिक्रमण आहे हे खरे आहे.

मौजे भांडेवाडी (ता.खटाव, जि.सातारा) येथील गट क्र. ४०९ हा गाव नमुना नं. ७/१२ नुसार सरकारच्या मालकीचा असून ग्रामपंचायतीच्या ताब्यात आहे. या गटामध्ये ग्रामपंचायत नमुना नं. २६ ला रस्त्याची नोंद नाही मात्र पुर्वीपासून वहिवाटीचा रस्ता आहे. या गटाची मोजणी केली असता त्यामध्ये १९३ अतिक्रमणे असल्याचे आढळून आले असून त्यामध्ये तत्कालिन सरपंच श्री.किसन नवलू फडतरे यांचे वडिलोपार्जित घर असून श्री.किसन नवलू फडतरे यांना जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडील दि.२०/४/२०१५ अन्वये अपात्र ठरविण्यात आले आहे. सध्या सरपंच पद रिक्त असून उपसरपंच, भांडेवाडी हे प्रभारी सरपंच असून त्यांचेही घर सदर अतिक्रमाणामध्ये आहे. सदरची घरे ही उक्त वहिवाटीच्या रस्त्यावर नाहीत.

(२) हे खरे नाही.

दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास सदर अतिक्रमणाबाबत ग्रामस्थ भांडेवाडी ता.खटाव यांचा लेखी अर्ज तहसीलदार, खटाव (वडूज) तसेच गट विकास अधिकारी वर्ग-१ पंचायत समिती, खटाव या कार्यालयाकडे प्राप्त झालेला नाही.

(३) व (४) मौजे भांडेवाडी ता.खटाव जि.सातारा येथील गट क्र. ४०९ मध्ये मोजणी अंती आढळून आलेली १९३ अतिक्रमणे काढण्यात ग्रामपंचायत भांडेवाडी मार्फत कार्यवाही सुरु आहे. मात्र मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे असल्याने स्थानिक लोंकांकडून यास विरोध करण्यात आला असून कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती उद्भवल्याने अतिक्रमणे काढण्याची कार्यवही करता आलेली नाही.

---

**मौजे असुर्डे ते कुंभारखाणी खुर्द रस्ताची (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) दुरवस्था झाल्याबाबत**

**(४०) ५३०३८ (०६-०५-२०१६). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे असुर्डे ते कुंभारखाणी खुर्द रस्ता (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) दुरवस्थेत व अरुंद असल्यामुळे दळणवळणाची गैरसोय होत आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता सुधारणा व रुंदीकरण करण्याबाबत स्थानिक नागरीकांनी मागणी करूनही त्याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे. तथापि सदर रस्त्यावर एस.टी.वाहतूक सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्नाधिन असुर्डे डिंगणी धामापूर घारेवाडी ते इजिमा ६४ ला मिळणार रस्ता ग्रामीण मार्ग क्र.५२ दर्जाचा असून त्याची लांबी १०.०० कि.मी. आहे. सदर रस्त्याच्या दुरस्तीचे व रुंदीकरणाचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेचा प्रयत्न राहिल.

---

**आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना जिल्हापरिषद सेस फंडातून आर्थिक मदत देण्यासाठी अहमदनगर जिल्हापरिषदेचा प्रस्ताव मंजूर करण्याबाबत**

**(४१) ५३०९५ (०६-०५-२०१६). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना जिल्हापरिषद सेस फंडातून आर्थिक मदत देण्यासाठी अहमदनगर जिल्हापरिषदेने माहे ऑक्टोबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, सदर प्रस्ताव मंजुरीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :**(१) सदर विषयांबाबतचा जिल्हा परिषद, अहमदनगर यांचा दि.२३/२/२०१६ चा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.

(२) जिल्हा परिषदेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाच्या दि.७ मे, २०१६ च्या पत्राद्वारे जिल्हा परिषदेस कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयातील जिल्हा परिषदे अंतर्गत येणारे ग्रामीण मार्ग, इतर जिल्हा मार्ग दर्जाच्या रस्त्यांची दुरुस्तीकरीता निधी मंजूर होण्याबाबत**

**(४२) ५३१२९ (०६-०५-२०१६). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील जिल्हा परिषदे अंतर्गत येणारे ग्रामीण मार्ग, इतर जिल्हा मार्ग दर्जाच्या रस्त्यांची अत्यंत दुरवस्था असून सुमारे ६८०० कि.मी लांबीच्या रस्त्यांची दुरुस्ती होणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी आवश्यक असलेला निधी सुमारे रू. १९३ कोटींचा प्रस्ताव जिल्हा परिषद रत्नागिरी बांधकाम विभागाकडून शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाला मान्यता मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील मजूरांना कामे मिळत नसल्याने मजूरांचे शहराकडे स्थलांतर होत असल्याबाबत**

**(४३) ५३२१८ (०६-०१-२०१६). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात मोठया प्रमाणात दुष्काळी परिस्थीती असून मजूरांना म.ग्रा.रो. योजनेअंतर्गत कामांची मागणी करुन देखील बिलोली तालुक्यातील मजूरांना कामे मिळत नसल्याने व ग्रामीण भागात कामे उपलब्ध नसल्याने नागरिकांना शहराकडे कामासाठी जावे लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ च्या दुस-या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१७-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.

नांदेड जिल्हयातील बिलोली तालुक्यात माहे जानेवारी, २०१६ मध्ये ३५२ मजूरांनी कामाची मागणी केली असून त्यांच्या मागणीनुसार त्यांना काम पुरविण्यात आले आहे.

मजूरांना काम उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने यंत्रण निहाय २१८ कामांचा सेल्फ उपलब्ध असून त्यांची मजूर क्षमता ५५२४ इतकी आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतींची लोकसंख्या, भौगोलिक परिस्थिती व दळणवळण आदी बाबींच्या आधारे विभक्ती करण्याबाबत**

**(४४) ५३२८३ (२८-०४-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतींची लोकसंख्या, भौगोलिक परिस्थिती व दळणवळण आदी बाबींच्या आधारे विभक्ती करण्याची मागणी लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांकडून करण्यात येत असल्याची बाब माहे मार्च, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने बीड जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतींची विभक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील २, परळी तालुक्यातील ३ व शिरुर कासार तालुक्यातील १ इ. ग्रामपंचायतींच्या विभक्तीकरणाच्या अनुषगाने प्राप्त प्रस्तावांना ८ मार्च, २०१६ च्या स्थायी समितीमध्ये विभागीय आयक्तांमार्फत शासनास पाठविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यापैकी गेवराई तालुक्यातील २ ग्रामपंचायतींच्या विभक्तीकरणाचे प्रस्ताव दिनांक २५/०४/२०१६ च्या पत्रान्वये विभागीय आयुक्तामार्फत शासनास सादर करण्यात आले आहेत. बीड जिल्ह्यातील ग्रामपंचायत विभाजनाबाबतच्या प्राप्त प्रस्तावांवर नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्हा व पुणे शहरास पाणी पुरवठा करणारे सर्व मोठ्या धरणात अत्यल्प पाणीसाठा शिल्लक असल्याने पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाल्याबाबत**

**(४५) ५३३०८ (०६-०५-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुळशी धरणातील केवळ ४ द.ल.घ.मी. पाणी स्थानिक ग्रामीण भागातील लोकांना पिण्यासाठी राखीव ठेवण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्हा व पुणे शहरास पाणी पुरवठा करणारे वरसगाव, खडकवासला, टेमघर, पानशेत या सर्व मोठ्या धरणात अत्यल्प पाणीसाठा शिल्लक असल्याने पावसाळ्यापर्यंत पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण होण्यास सुरुवात झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, टाटा (मुळशी) धरणातील सध्याचा संपूर्ण जलसाठा पुणे शहर व पुणे जिल्ह्यातील रहिवास्यांसाठी आरक्षित करण्याची गरज असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-१०-२०१६) :**(१) नाही.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### यावल (जि.जळगाव) येथील पंचायत समितीच्या इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(४६) ५३३५९ (०६-०५-२०१६). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यावल (जि.जळगाव) येथील पंचायत समिति इमारत अत्यंत जीर्ण व धोकादायक झालेली असून त्यासंबंधी शासनाकडे नविन प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पंचायत समितीच्या इमारतीचे बांधकाम सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :**(१) होय.
(२) यावल पंचायत समिती नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यासाठी जिल्हा परिषदेकडून प्राप्त प्रस्तावाबाबत त्रुटींची पूर्तता करण्यासाठी कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### निंभोरा (ता.रावेर जि.जळगाव) येथील सुकी नदीवरील पुल अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४७) ५३३६० (०६-०५-२०१६). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निंभोरा (ता.रावेर, जि.जळगाव) येथील सुकी नदीवरील प्रधान मंत्री ग्रामीण सड़क योजनेंतर्गत मंजूर असलेल्या पुलाचे बांधकाम अपूर्णावस्थेत असून बंद पडलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदर पुलाचे बांधकाम बंद असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास,सदर पुलाचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-०९-२०१६) :**(१), (२) व (३) सदर काम प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दमणगंगा - पिंजाळ राष्ट्रीय नदी जोड प्रकल्पाच्या सामंजस्य कराराबाबत**

**(४८) ५४६०१ (२६-०८-२०१६). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दमणगंगा व नारपार, औरंगाबाद , अंबिका इ.खोऱ्यातील जलनियोजनाबाबत दिनांक ४ एप्रिल २०१६ रोजी वा त्यासुमारास सनियंत्रण समिती गठीत केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, समिती गठीत करण्याआधी दमणगंगा - पिंजाळ राष्ट्रीय नदी जोड प्रकल्पाचा सामंजस्य करार अंतिम करण्यासाठी शासनाने दिनांक १७ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास केंद्र शासनाने संमती दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सनियंत्रण समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे काय व अहवालावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०६-१०-२०१६) :**(१) होय,
(२) होय,
(३) अहवाल प्राप्त झाला असून शासन स्तरावर कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्र शासनाने अल्पबचत व महिला प्रधान बचत योजना अंमलात आणून यातून बचतीला प्रोत्साहन दिले असताना महिला प्रतिनिधींना एजन्सी देणेच बंद केल्याबाबत**

**(४९) ५९९५३ (२४-०८-२०१६). अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने अल्पबचत व महिला प्रधान बचत योजना अंमलात आणून यातून बचतीला प्रोत्साहन देऊन राष्ट्रीय उत्पन्नात भर पडत असतानाही सन २००५ पासून महिला प्रतिनिधींना एजन्सी देणेच बंद केले असल्याचे माहे मे २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजना पुन्हा सुरु करावी, यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-१०-२०१६)** :(१) हे खरे नाही. सदर बाब सन २००५ मध्येच निदर्शनास आणण्यात आली आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील धरणामधील पाणी साठ्याच्या माहितीचे संकेतस्थळ**
**कित्येक महिन्यापासून अपडेट नसल्याबाबत**

**(५०) ६३३६४ (२९-०८-२०१६). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील धरणामध्ये पाणी साठ्याची माहिती नागरिकांना कळण्याकरिता सुरु करण्यात आलेले शासनाचे संकेतस्थळ गेली कित्येक महिन्यापासून अपडेट होत नसल्याचे माहे फेब्रुवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ही माहिती दैनंदीन अपडेट करण्याची जबाबदारी कोणाची आहे व याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर कारवाई करण्याबाबत व संकेतस्थळ अपडेट करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-०९-२०१६)** :(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** | **डॉ. अनंत कळसे**
**नागपूर.** | **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.